**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com


**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.०८/०४/२०२६

## महासभा व स्थायी समितीच्या मंजूर विषयांचा आढावा घेण्यासाठी माननीय महापौरांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक संपन्न

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मा.महासभा आणि मा.स्थायी समितीमध्ये मंजूर झालेल्या विविध लोककल्याणकारी व विकास कामांना गती देण्यासाठी मा.महापौर श्री.अजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८ एप्रिल २०२६ रोजी महानगरपालिका मुख्यालयात विशेष आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

शहराच्या विकास प्रकल्पांची अंमलबजावणी जलद गतीने व्हावी आणि नागरिकांना दर्जेदार सुविधा लवकरात लवकर मिळाव्यात, हा या बैठकीचा मुख्य हेतू होता. मागील कार्यकाळात झालेल्या सभांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर विविध ठराव मंजूर करण्यात आले आहेत. या मंजूर विषयांच्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर सध्या काय कार्यवाही सुरू आहे, याचा थेट आढावा यावेळी घेण्यात आला.

मंजूर झालेल्या प्रस्तावांपैकी कोणते प्रस्ताव निविदा स्तरावर आहेत, किती कामांना प्रत्यक्ष सुरुवात झाली आहेत, प्रस्तावांची सध्यस्थिती याची सविस्तर माहिती यावेळी घेण्यात आली. निविदा प्रक्रिया आणि कार्यादेश (Work Order) स्तरावर प्रलंबित असलेली कामे त्वरित मार्गी लावण्याचे निर्देश मा.महापौर महोदयांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. काही कामात येणाऱ्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणींवर यावेळी चर्चा करून त्या तात्काळ सोडवण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या. नियोजित वेळेत कामे पूर्ण करण्यासाठी कालबद्ध आराखडा (Timeline) यावेळी निश्चित करण्यात आला. प्रशासकीय दिरंगाई टाळून विकासकामांना वेग देण्यासाठी आणि मंजूर निधीचा योग्य विनियोग करण्यासाठी ही अत्यंत महत्वाची बैठक घेण्यात आली.

या बैठकीस मा.महापौर श्री.अजीव पाटील, मा.उप-महापौर श्री.मार्शल लोपीस, मा.स्थायी समिती सभापती श्री.प्रवीण शेट्टी, मा.अतिरिक्त आयुक्त श्री.संजय हेरवाडे, महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.